पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०७९ दि. २४ /०९ /२०१९**

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.**

## “विधानसभा निवडणुक २०१९ च्या अनुषंगाने दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगारास केले २ वर्षा करीता पुणे जिल्हयातुन तडीपार”

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दत्तवाडी पोलीस स्टेशनकडुन हद्दीतील सराईत गुन्हेगारांवर कारवाई करण्याची सुरुवात झाली असुन गंभीर गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगाराला परिमंडळ ३चे पोलीस उप-आयुक्त पौर्णिमा गायकवाड यांनी पुणे शहर व जिल्हयातुन दोन वर्षासाठी तडीपार केले आहे.

दत्तवाडी पोलीस ठाणे अभिलेखावरील शुभम प्रकाश रोकडे रा.स.नं.९२, शाहु वसाहत, लक्ष्मीनगर, पुणे असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. हा गुन्हेगार सराईत असुन, त्याचे विरूध्द **दरोडा प्रयत्न, मारामारी, गंभीरदुखापत असे एकुण ०४ गुन्हे दाखल आहेत.**त्याचेकडून दत्तवाडी पोलीस स्टेशन परीसरामध्ये दहशत पसरवुन सामाजिक शांतता भंग करण्याची शक्यता पोलीसांकडुन व्यक्त केली जात होती.तसेच आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने त्याचेकडुन स्थानिक नागरीकांना त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

त्यामुळे दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. देविदास घेवारे यांनी शुभम रोकडे यास तडीपार करण्यासाठी परिमंडळ ३ चे पोलीस उप-आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार पोलीस उप-आयुक्त पौर्णिमा गायकवाड यांनी शुभम रोकडे यास २ वर्ष पुणे शहर व  पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयातुन तडीपार केले आहे.

सदरचा प्रस्ताव वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. देविदास घेवारे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक कुलदिप संकपाळ व पोलीस कर्मचारी अमरनाथ लोणकर व योगेश सुरवसे यांनी तयार करुन मा. पोलीस उप-आयुक्त सो, परिमंडळ-३, पुणे शहर यांचे कार्यालयात सादरकेला होता. तसेच या वर्षभरात दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील ०७ सराईत गुन्हेगारांना तडीपार केले आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर.